**जन लोकायुक्त विधेयक, २०११**

**हेतू आणि कारणे याविषयीचे निवेदन**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या भ्रष्टाचारविरोधी कराराच्या प्रस्तावनेत संयुक्त राष्ट्रसंघाचे तत्कालीन सरचिटणीस कोफी अन्नान यांनी म्हटले होते, की भ्रष्टाचार हा अत्यंत हानिकारक आणि समाजाच्या सर्व स्तरांवर व्यापक दुष्परिणाम करणारा समाजाचा आजार आहे. भ्रष्टाचारामुळे लोकशाहीचा आणि कायदे यंत्रणेच्या चौकटीचा ऱ्हास होतो. मानवी हक्कांचा भंग होतो. बाजारपेठा विस्कळित होतात. जीवनाचा दर्जा खालावतो. सामूहिक गुन्हेगारीला भ्रष्टाचार खतपाणी घालतो. दहशतवाद आणि मानवी सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अनेक बाबींना यांतून उत्तेजन मिळते.

सर्व लहानथोर आणि गरीब, श्रीमंत अशा सर्व प्रकारच्या देशांत हा रोग आढळतो. मात्र विकसनशील देशांमध्ये त्याचे परिणाम अत्यंत भयावह आणि विनाशकारी असतात. विकासाचे निधी दुसरीकडे वळवले गेल्यामुळे गरीब लोकांवर भ्रष्टाचाराचे तीव्र दुष्परिणाम होतात. प्राथमिक सेवासुविधा पुरविण्याच्या सरकारच्या क्षमतेवर भ्रष्टाचारामुळे विपरित परिणाम होतात. असमानता आणि अन्याय वाढून परदेशी मदतीला आणि गुंतवणुकीलाही आळा बसतो. भ्रष्टाचार हे आर्थिक अक्षमतेचे एक प्रमुख कारण आहे. तसेच दारिद्र्य निर्मूलन आणि विकास यांच्या मार्गातीलही तो मोठाच अडसर आहे.

या परिषदेच्या प्रस्तावावर ३१ ऑक्टोबर, २००३ रोजी भारताने सही केली आहे. या प्रस्तावाला मान्यताही दिली आहे. ज्या देशांनी या प्रस्तावावर सह्या केल्या त्यांना या  समस्येचे गांभीर्य समजल्यामुळे चिंता वाटत होती. भारताने या प्रस्तावावर सही करताना म्हटले आहे, की  ‘समाजाचे स्थैर्य आणि सुरक्षितता यांना भ्रष्टाचारामुळे निर्माण होणारे धोके सही करणाऱ्या देशांना माहिती आहेत. भ्रष्टाचारामुळे विविध संस्था आणि समाज पोखरला जातो. लोकशाही आणि नैतिक मूल्ये, तसेच न्यायव्यवस्था धोक्यात येते. त्यामुळे स्थिर विकास आणि कायदे पांगळे ठरतात,’

सन १९९३ मध्येच एन. एन. व्होरा समितीच्या अहवालात भारतातील भ्रष्टाचाराचे गंभीर परिणाम स्पष्ट करण्यात आले होते. या अहवालात म्हटले होते, की ‘देशाच्या विविध भागांत गुन्हेगारी टोळ्या, पोलीस, नोकरशाही आणि राज्यकर्ते यांच्यात लागेबांधे असल्याचे स्पष्ट झाले आहे. वैयक्तिक गुन्हेगारांसाठी तयार करण्यात आलेली सध्याची न्यायव्यवस्था म्हणूनच अशा संघटित गुन्हेगारांचा निवाडा करताना कमी पडते. आर्थिक गुन्ह्यांच्यासंदर्भात असलेले कायदे अत्यंत कमकुवत आहेत. संघटित गुन्हेगार आणि माफिया यांच्या टोळ्यां यांच्याकडे मोठ्या प्रमाणात गुंड आहेत आणि आर्थिक पाठबळही आहे. शिवाय सरकारी यंत्रणा आणि राजकीय नेते आणि सर्व संबंधित घटक यांच्याशी त्यांचे लागेबांधे असतात.

भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण नक्कीच गंभीर आहे आणि सध्याच्या भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा त्याचा सामना करण्यात अपयशी ठरल्या आहेत. त्यामुळेच या यंत्रणांना आणि भ्रष्टाचारविरोधी कायद्यांना खिळखिळ्या करून टाकणाऱ्या भ्रष्टाचाराच्या राक्षसाची गांभीर्याने दखल घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

यूएनसीएसीच्या (संयुक्त राष्ट्रसंघाचा भ्रष्टाचारविरोधी करार) कलम ६ (२) अन्वये, प्रत्येक राज्याने या कलमाच्या पहिल्या परिच्छेदात नमूद केलेल्या भ्रष्टाचारविरोधी यंत्रणेला किंवा यंत्रणांना कायदे यंत्रणेच्या मूलभूत तत्त्वांबाबत आवश्यक स्वायत्तता दिली पाहिजे. त्यामुळे ही यंत्रणा किंवा या यंत्रणा त्यांचे कार्य किंवा कार्ये प्रभावीपणे करू शकतील. तसेच कोणत्याही अनावश्यक दबावाला त्याबळी पडणार नाहीत. याशिवाय त्यांना आपले काम परिणामकारकतेने करता यावे, यासाठी आवश्यक साधनसामग्री पुरवली पाहिजे. तसेच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची सुविधाही राज्यांनी पुरवली पाहिजे.

या विधेयकामधून महाराष्ट्र राज्यात लोकायुक्ताच्या रचनेला दुजोरा मिळतो. लोकायुक्त यंत्रणा स्वायत्त असली पाहिजे. सार्वजनिक अधिकाऱ्यांचा समावेश या यंत्रणेत करता येणार नाही. तसेच सार्वजनिक अधिकारी यंत्रणेपासूनही ती मुक्त असेल. तरच ही यंत्रणा तपास करणे आणि खटले भरणे ही कामे निःपक्षपातीपणे करू शकेल. ही स्वायत्तता व्यापक, पारदर्शी निवड प्रक्रिया आणि कामाचे संपूर्ण स्वातंत्र्य देऊन निर्माण करता येईल. म्हणूनच या विधेयकात नमूद करण्यात आल्याप्रमाणे लोकायुक्ताला स्वतःलाच आपल्या कर्मचाऱ्यांची निवड करण्याचा अधिकार असेल. भ्रष्टाचार, गैरवर्तन आणि तक्रारी किंवा गाऱ्हाणी या बाबी हाताळण्यास असा कर्मचारी वर्ग सक्षम असेल. या सर्व गोष्टींचा परस्परसंबंध आहे. भ्रष्टाचारात नेहमीच गैरवर्तन अंतर्भूत असते आणि त्यातूनच तक्रारी निर्माण होतात. सध्याची तक्रार निर्मूलन किंवा देखरेख यंत्रणा कुचकामी ठरली आहे. कारण सध्याच्या तक्रार निर्मूलन समित्यांना किंवा देखरेख समित्यांना स्वारस्याच्या संघर्षातून जावेच लागते. यात काही समस्या आहेत. सध्याच्या यंत्रणेत आपल्याच वरिष्ठावर किंवा अधिकाऱ्यावर कनिष्ठ अधिकाऱ्याला नाईलाजाने लक्ष ठेवण्याचे काम करावे लागते. या वरिष्ठांचेच त्यांच्यावर प्रशासकीय नियंत्रण असते. म्हणूनच देखरेख यंत्रणा आणि तक्रार निर्मूलन यंत्रणा यांना लोकायुक्ताच्या देखरेखीखाली ठेवण्याची तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

यूएनसीएसीच्या कलम ७ (४) नुसार, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य स्वारस्यांचा संघर्ष

रोखणारी आणि पारदर्शकतेला प्रोत्साहन देणारी यंत्रणा निर्माण करेल, तिच्यात स्थैर्य राखेल आणि तिला वृद्धिंगतही करेल. या तत्त्वांच्या पायांवरच भ्रष्टाचाराच्या प्रकरणांचा तपास करणे, त्या संदर्भात खटले भरणे, तसेच गैरवर्तनाची चौकशी करणे आणि शिक्षा देणे या गोष्टी स्वारस्याचा संघर्ष नसलेल्या स्वायत्त यंत्रणेकडे सोपविणे ही अत्यंत गरजेची गोष्ट ठरते.

यूएनसीएसीच्या कलम ८ (५) नुसार, सार्वजनिक अधिकाऱ्यांनी आपली मालमत्ता, आपले इतर कार्यक्रम, रोजगार, गुंतवणूक, मालमत्ता, ज्यांच्यातून स्वारस्याचा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असेल, अशा आपल्याला मिळालेल्या भेटी आणि लाभ यांची माहिती योग्य अधिकारी यंत्रणेकडे सादर करावी, यासाठी आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य उपाययोजना योजण्याचे आणि यंत्रणा उभारण्याचे प्रयत्न करेल.

यूएनसीएसीच्या कलम ८ (६) नुसार, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून प्रत्येक राज्य या कलमाने घालून दिलेली आचारसंहिता किंवा मानके यांचा भंग करणाऱ्या सार्वजनिक अधिकाऱ्यांवर शिस्तविषयक किंवा इतर प्रकारची कारवाई करण्याचा विचार करेल.

यूएनसीएसीच्या कलम १२ मध्ये खासगी क्षेत्राचा विचार करण्यात आला आहे. खासगी यंत्रणांना त्यांच्या कामकाजात अधिकाधिक पारदर्शकता आणण्यासाठी राज्य सरकारने प्रोत्साहन दिलेच पाहिजे. उद्योगाची स्थापना आणि व्यवस्थापन यांच्यात सहभागी असलेल्या वैध आणि नैसर्गिक व्यक्तींची ओळख पटवून दिली जावी, यासाठी उपाययोजना करणे राज्य सरकारवर बंधनकारक असेल. याशिवाय राज्य सरकारवर इतरही काही गोष्टी बंधनकारक असतील. खासगी यंत्रणांकडून प्रक्रियांचा गैरवापर होत असेल तर तो रोखणे, उदाहरणार्थ, खासगी अधिकार यंत्रणांकडून व्यापारी कारणांसाठी परवाने आणि अनुदान देताना प्रक्रियांचा गैरवापर केला जात असेल, तर तो रोखणे. तसेच स्वारस्याचा संघर्ष रोखण्यासाठी माजी सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या व्यावसायिक कृतींवर योग्य काळासाठी योग्य बंधने लादणे, राजीनामा दिलेल्या किंवा निवृत्त झालेल्या सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या पूर्वीच्या कार्यकालातील त्यांच्या कामाशी किंवा त्यांनी देखरेख केलेल्या कामाशी थेट संबंधित असलेल्या खासगी क्षेत्रांतील रोजगारासाठीच्या नेमणुकीमुळे जर स्वारस्याचा संघर्ष उद्भवण्याची शक्यता असेल, तर अशा माजी सार्वजनिक अधिकाऱ्यांच्या अशा नेमणुकांवर बंधन घालणे,

यूएनसीएसीचे कलम १३, समाजाच्या सहभागाशी संबंधित आहे. भ्रष्टाचार रोखण्यासाठी आणि भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा देण्यासाठी, तसेच भ्रष्टाचाराचे अस्तित्व, कारणे, त्याचे गांभीर्य आणि धोके या संदर्भात जनजागृती करण्यासाठीही सार्वजनिक क्षेत्राबाहेरील व्यक्ती आणि संस्था यांच्या सक्रिय सहभागाला राज्य सरकार आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून,आवश्यक उपाययोजना करून प्रोत्साहन देईल. सार्वजनिक क्षेत्राबाहेरील व्यक्ती आणि संस्था यांमध्ये नागरी समाज, अशासकीय संघटना आणि अशासकीय गटांच्या संस्था यांचा समावेश असेल. हा सहभाग पुढीलप्रमाणे वाढवला जाईल. निर्णय प्रक्रियांतील पारदर्शकता वाढवणे आणि त्यांच्यातील लोकांचा त्यांमधील सहभाग वाढवणे. लोकांना सहज व प्रभावीपणे माहिती उपलब्ध होण्याची हमी देणे.

यूएनसीएसीच्या कलम ३४ नुसार, तिसऱ्या पक्षाच्या हक्कांविषयी योग्य तो आदर राखून, सद्‌भावनेपोटी, आपल्या स्थानिक कायद्यांच्या मूलभूत तत्त्वांच्या अधीन राहून भ्रष्टाचाराच्या घटना समोर याव्यात यासाठी राज्य सरकार उपाययोजना करेल. या संदर्भात राज्य सरकार कायदेशीर कारवाई करून भ्रष्टाचाराचा मुद्दा महत्त्वपूर्ण मानून संबंधितांचे कंत्राट रद्द करू शकेल किंवा सवलती मागे घेईल किंवा तत्सम कोणतीही प्रतिबंधात्मक उपाययोजना करेल.

यूएनसीएसीच्या वरील सर्व तत्त्वांचा विचार करता, भ्रष्टाचाराच्या संदर्भात सार्वजनिक अधिकाऱ्यांचा तपास करणे किंवा त्यांच्यावर खटला भरणे आणि सरकारी अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारासाठी शिक्षा करणे या बाबी स्वायत्त लोकायुक्त अधिकार यंत्रणेच्या कार्यकक्षेत आणल्या जातील. त्याशिवाय नागरिकांच्या सनदेचा भंग ही बाब आचारसंहितेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या संदर्भातील प्रकरणांचीही चौकशी लोकायुक्तांच्या देखरेखीखाली केली जाईल. याशिवाय लोकसेवकांनी भ्रष्टाचारी मार्गाने गोळा केलेली मालमत्ता जप्त करणे असे इतर अधिकारही लोकायुक्तांना असतील. शक्य असेल तिथे लोकसहभाग मिळवणे आणि कारभारात पारदर्शकता ठेवणे यांतून या यंत्रणेचा आणि तिच्या नियंत्रणाखालील भ्रष्टाचारविरोधी किंवा देखरेख यंत्रणेचा प्रामाणिकपणा राखला जाईल. लोकायुक्तांचे दायित्व थेटपणे नागरिकांशी असेल. ते नागरिकांना जबाबदार असतील. कोणताही नागरिक मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करू शकेल. लोकायुक्ताचे अध्यक्ष किंवा सदस्यांची चौकशी करणे किंवा त्यांना पदावरून दूर करणे हे अधिकार उच्च न्यायालयाला असतील. लोकायुक्ताचे अधिकारी स्वतंत्र तक्रारींसंदर्भात लोकायुक्तांखेरीज तक्रारींशी संबंधित वेगवेगळ्या अधिकारी यंत्रणांनाही जबाबदार असतील. कलम २२६ अंतर्गत उच्च न्यायालये आणि कलम ३२ व १३६ अंतर्गत सर्वोच्च न्यायालय लोकायुक्तांच्या कृतींचा कायदेशीर आढावा घेऊन त्यांच्या जबाबदारपणाचा निर्वाळा देतील.

प्रभावी, स्वायत्त आणि अधिकार प्रदान केलेली लोकायुक्त संस्था ही काळाची गरज असून तिच्या स्थापनेसाठी आणखी काही काळ महाराष्ट्र शासन प्रतीक्षा करू शकणार नाही. या विधेयकातून हे उद्दिष्ट सफल करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

-----------------------------------

**महाराष्ट्र जन लोकायुक्त विधेयक, २०११**

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत आरोपांचा जलद गतीने तपास करणे, आरोपींवर खटले दाखल करणे आणि विशिष्ट प्रकारच्या सार्वजनिक तक्रारींचे निवारण करणे आणि तक्रारकर्त्यांना संरक्षण पुरविणे या हेतूंनी हे विधेयक तयार करण्यात आले आहे. भारताच्या ६१ व्या प्रजासत्ताक दिनी या विधेयकाची अंमलबजावणी होणे अपेक्षित होते.
हे विधेयक असे आहे.

**प्रकरण एक**

**प्रस्तावना**

(१). १) या कायद्याला महाराष्ट्र जन लोकायुक्त कायदा, २०११ असे म्हटले जाईल.
२) महाराष्ट्र सरकारने मान्यता दिल्यानंतर १२० व्या दिवसापासून त्याची अंमलबजावणी सुरू होईल.
३) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू होईल.
(२). व्याख्या
या कायद्यातील काही शब्दांच्या व्याख्या खालीलप्रमाणे केल्या जातील.
(अ) मंडळ : लोकायुक्ताचे अध्यक्ष आणि इतर सदस्यांना सामूहिकरित्या मंडळ म्हटले जाईल.
(ब) तक्रार : म्हणजे भ्रष्टाचाराचा आरोप किंवा तक्रारकर्त्याने केलेली संरक्षणाची आणि योग्य कारवाईची मागणी.
(क) लोकायुक्त : याचा अर्थ आणि यात समाविष्ट असलेल्या गोष्टी –
अ. या कायद्याखाली तयार करण्यात आलेली आणि कामकाज करणारी खंडपीठे.
ब. या कायद्याखाली कामकाज करणारा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी.
क. उर्वरित सर्व प्रकरणांमध्ये मंडळ.
(ड) लोकायुक्ताचे खंडपीठ : म्हणजे नियमांना बांधील राहून कोणत्याही प्रकरणामध्ये एकत्रितपणे कामकाज करणारे लोकायुक्तांमधील दोन किंवा त्याहून अधिक सदस्यांचे खंडपीठ. प्रत्येक खंडपीठामध्ये कायदेशीर पार्श्वभूमी असलेला एक सदस्य असेल.
(ई) भ्रष्टाचाराची कृती : यांत खालील बाबी समाविष्ट होतात.
अ. भारतीय दंड संहितेच्या चाप्टर खद मध्ये किंवा भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ मध्ये शिक्षेस पात्र ठरवलेली कोणतीही कृती. महाराष्ट्राच्या विधानसभेत निवडून गेलेल्या कोणत्याही सदस्याने केलेल्या गुन्ह्याचाही यात समावेश होतो. या सदस्याने विधानसभेच्या सभागृहात केलेले वक्तव्य किंवा मतही यात अंतर्भूत आहे.
ब. एखाद्या कायद्याचा किंवा नियमाचा भंग करून एखाद्या व्यक्तीला जाणीवपूर्वक कोणताही फाजील लाभ मिळवून देणे किंवा एखाद्या लोकसेवकाकडून स्वतःसाठी फाजील लाभ मिळवणे.
क. साक्षीदार किंवा तक्रारकर्ता यांना बळी बनवणे किंवा त्रास देणे.
ड. नागरिकांच्या सनदेचा लोकसेवकाने वारंवार केलेला भंग.
(फ) संपूर्ण खंडपीठ : सात सदस्यीय खंडपीठ. त्यात अध्यक्षांचा समावेश असेल किंवा नसेल.
(ग) सरकार : म्हणजे महाराष्ट्र सरकार.
(ह) सरकारी नोकर : म्हणजे निवडून दिलेला प्रतिनिधी नसलेला किंवा महाराष्ट्राच्या सीमेअंतर्गत असलेल्या कोणत्याही न्यायालयीन कार्यालयात काम करणारा अधिकारी नसलेला कोणताही सार्वजनिक कर्मचारी
(इ) गाऱ्हाणे : संबंधित विभागाच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे तक्रार करूनही नागरिकांच्या सनदेनुसार, समाधानकारकरित्या तक्रारीचे निर्मूलन होत नसल्याचा एखाद्या व्यक्तीचा दावा.
(ज) न्याय अधिकारी : या कायद्याच्या सेक्शन २२ अंतर्गत नेमलेला अधिकारी.
(ख) शिक्षा : या कायद्यांतर्गत केली जाणारी शिक्षा म्हणजे कामावरून काढून टाकणे, दूर करणे किंवा हुद्दा कमी करणे.
(इ) सार्वजनिक अधिकार यंत्रणा : म्हणजे कोणतीही स्वयंनियंत्रित अधिकार यंत्रणा किंवा संस्था किंवा अधिकारी मंडळ. याची स्थापना किंवा रचना खालीलप्रमाणे झालेली असते.
१) घटनेद्वारे किंवा घटनेअंतर्गत.
२) राज्य विधान मंडळाने केलेल्या कोणत्याही अन्य कायद्यांतर्गत.

३) राज्य सरकारची जाहीर सूचना, परिपत्रक किंवा कायद्याद्वारे स्थापन झालेली आणि राज्य सरकारच्या मालकीची, नियंत्रणाखाली असलेली किंवा अंशतः आर्थिक मदत दिली जाणारे कोणतेही अधिकार मंडळ.
(म) लोकसेवक : महाराष्ट्रातील सार्वजनिक कार्यालय सांभाळलेली किंवा सांभाळणारी कोणतीही व्यक्ती आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ च्या सेक्शन २ (क) अंतर्गत असलेल्या अर्थाने जी लोकसेवक आहे, ती व्यक्ती.
(न) तक्रारकर्ता : सार्वजनिक अधिकार यंत्रणेतील भ्रष्टाचाराची माहिती देणारी किंवा त्या प्रकरणाची साक्षीदार असलेली अगर बळी ठरलेली कोणतीही व्यक्ती किंवा खालील प्रकारच्या धमक्यांना तोंड द्यावे लागत असलेली कोणतीही व्यक्ती.
१. व्यावसायिक हानी किंवा नुकसान. यात अन्याय्य बदली, बढती नाकारणे, वेतनाव्यतिरिक्तचे वैध आर्थिक लाभ नाकारणे, विभागीय चौकशी किंवा तत्सम बाबी, भेदभाव करणे यांचा समावेश होतो किंवा
२. शारीरिक इजेची धमकी किंवा
३. प्रत्यक्षात शारीरिक इजा करणे.
मात्र या धमक्यांपुरत्याच या धमक्या मर्यादित नाहीत.
या कायद्याखाली लोकायुक्तांकडे तक्रार केल्याबद्दल किंवा माहितीचा अधिकार, २००५ खाली अर्ज केल्याबद्दल किंवा गैरप्रशासन किंवा भ्रष्टाचार उघड करणे अगर रोखणे या हेतूने कोणतीही कायदेशीर कारवाई केल्याबद्दल हा त्रास दिला जात असेल.
(३) या कायद्यातील तरतुदी इतर कोणत्याही कायद्यांत नसतील, तरीही ग्राह्य धरल्या जातील.
या कायद्यातील तरतुदी इतर कायद्यांमधील तरतुदींच्या विरुद्ध असतील किंवा विसंवादी असतील, तर इतर कायद्यांतील तरतुदींमध्ये या कायद्यातील तरतुदींप्रमाणे दुरुस्ती करून घेतली जाईल.
-------------------------------------------------

**प्रकरण २**

**लोकायुक्ताची स्थापना**

(४) १) हा कायदा लागू झाल्यावर तातडीने राज्य सरकार जाहीर नोटिशीद्वारे लोकायुक्त संस्थेची स्थापना करेल. प्रशासकीय, आर्थिक अगर कारभाराच्या दृष्टीने ही संस्था सरकारवर अजिबात अवलंबून नसेल. ती स्वायत्त असेल.
२) लोकायुक्तामध्ये अध्यक्ष आणि इतर दहा सदस्य असतील. त्यांच्या हाताखाली विविध स्तरांवर विविध अधिकारीही असतील. या कायद्याखाली नेमून दिलेले विविध प्रकारचे कामकाज ते पार पाडतील.
३) निवड समितीच्या शिफारशीनुसार, लोकायुक्ताच्या अध्यक्षांची आणि या सदस्यांची राज्यपाल नियुक्ती करतील.
४) लोकायुक्ताचे सदस्य किंवा अध्यक्ष बनण्यास खालील व्यक्ती अपात्र असतील.
अ) भारताची नागरिक नसलेली कोणतीही व्यक्ती.
ब) नैतिकदृष्ट्या नीच कृत्य केल्याविषयीचा खटला एखाद्या न्यायालयात फक्त दाखल जरी झाला असेल तरी ती व्यक्ती किंवा
क) ४५ वर्षांखालील कोणीही व्यक्ती किंवा
ड) कोणत्याही सरकारी सेवेत असलेली व्यक्ती किंवा राजीनामा दिल्यामुळे अगर निवृत्तीमुळे सरकारी सेवेतून गेल्या दोन वर्षांत मुक्त झालेली व्यक्ती.
५) लोकायुक्तातील किमान पाच व्यक्तींना कायदेशीर पार्श्वभूमी असली पाहिजे.
स्पष्टीकरण : कायदेशीर पार्श्वभूमी म्हणजे त्या व्यक्तीने भारताच्या सीमेअंतर्गत असलेल्या कोणत्याही न्याय यंत्रणेचे कार्यालय किमान दहा वर्षे सांभाळलेले असावे किंवा उच्च अगर सर्वोच्च न्यायालयात वकील म्हणून किमान १५ वर्षे काम केलेले असावे.
६) निवड समितीत खालील व्यक्तींचा समावेश असेल.
१. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री. निवड समितीचे ते अध्यक्ष असतील.
२. महाराष्ट्र विधानसभेतील विरोध पक्ष नेते.
३. मुंबई उच्च न्यायालयाच्या सर्व न्यायमूर्तींनी निवडलेले दोन न्यायमूर्ती.
४. निवड समितीचे हे सदस्य आणखी तीन सदस्यांची निवड करतील. भारताचे निवृत्त मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती, उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश, निवृत्त मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवृत्त कॉम्प्रोटलर अँड ऑडिटर जनरल यांमधून हे सदस्य निवडले जातील. या सदस्यांचा प्रामाणिकपणाबद्दल लौकिक असला पाहिजे. निवृत्तीनंतर त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश केलेला नसावा. तसेच कोणत्याही सरकारच्या अखत्यारीतील कोणतेही कार्यालय ते सांभाळत नसावेत. भारताच्या माजी मुख्य न्यायाधीशांची जर या निवड समितीवर निवड झाली, तर निवड समितीचे अध्यक्षपद तेच भूषवतील. या उपकलमाखाली,

दोनहून अधिक निवृत्त न्यायाधीशांची निवड करता येणार नाही.
५. या कायद्याखाली नेमण्यात आलेले लोकायुक्ताचे सर्व माजी अध्यक्ष.
७) शोध समितीने तयार केलेल्या निवडक व्यक्तींच्या यादीतून निवड समिती लोकायुक्ताचे अध्यक्ष आणि इतर सदस्यांची निवड करेल. कायद्याची सर्वंकष माहिती असलेली व्यक्तीच अध्यक्ष बनू शकेल.
८) शोध समितीचे पाच सदस्य असतील. कलम ६ (४) मध्ये नमूद केलेले तीन सदस्य नागरी समाजातून इतर दोन सदस्यांची एकमताने शोध समितीवर निवड करतील.
९) लोकायुक्तामध्ये नेमण्यात येणाऱ्या सदस्यांच्या अगर अध्यक्षांच्या निवडीसाठी उमेदवारांची निवडक यादी तयार करण्यासाठी आपल्याला योग्य वाटणाऱ्या व्यक्ती किंवा व्यक्तींच्या वर्गातून शोध समिती नामांकने मागवेल.
(१०) आपल्या सार्वजनिक सेवा काळात भ्रष्टाचाराच्या विरोधात लढा दिलेल्या आणि प्रामाणिकपणाबद्दल लौकिक असलेले लोकच नामांकनासाठी पात्र समजले जातील.
(११) नामांकने मिळालेल्या व्यक्तींच्या शिफारशींमध्ये त्या व्यक्तीवर कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही प्रकारचा आरोप झाला असेल तर, भूतकाळात त्याने भ्रष्टाचाराविरोधात दिलेल्या लढ्याचे तपशील, या कामासाठी ती व्यक्ती योग्य कशी आहे, त्याविषयीची कारणे आणि शोध समिती ठरवेल ती अन्य कोणत्याही प्रकारची माहिती यांचा समावेश असला पाहिजे.
(१२) उमेदवारांची पार्श्वभूमी आणि त्याचे कर्तृत्व याविषयीची शक्य तेवढी सर्व माहिती अन्य कोणत्याही मार्गाने शोध समिती मिळवू शकेल.
(१३) ही नामांकने वेबसाईटवर उपलब्ध करून दिली जातील. नेमणुकांसाठी या व्यक्ती योग्य आहेत की नाहीत याविषयीच्या लोकांच्या प्रतिक्रिया मागवल्या जातील.
(१४) जनतेकडून आलेली मते आणि त्यांनी पाठवलेली माहिती यांच्या आधारे सहसा एकमताने शोध समिती लोकायुक्तावर नेमण्यात यावयाच्या सदस्यांच्या संख्येच्या तिप्पट उमेदवारांची यादी तयार करेल.
(१५) शोध समितीतील कोणत्याही तीन उमेदवारांनी हरकत घेतलेल्या व्यक्तींची नावे या निवडक उमेदवारांच्या यादीत समाविष्ट केली जाणार नाहीत.
(१६) निवड समितीकडे ही निवडक उमेदवारांची यादी पाठविण्याअगोदर निवडक उमेदवारांची यादी सार्वजनिक वेबसाईटवर ठेवली जाईल. या व्यक्तींविषयीची माहिती किंवा मते जनतेने पाठवावीत, हाच यामागचा हेतू असेल.
(१७) या निवडक यादीतील उमेदवारांच्या सर्वंकष माहितीचा विचार करून निवड समिती सहसा एकमताने सदस्यांची निवड करेल. मात्र निवड समितीच्या तीनहून अधिक सदस्यांनी हरकत घेतलेल्या उमेदवाराची निवड केली जाणार नाही.
(१८) राज्यपालांकडे या उमेदवारांच्या नावांची शिफारस करण्यापूर्वी निवड समिती संबंधित उमेदवारांना सदस्यपदी, अगर अध्यक्षपदी निवड झालेल्या उमेदवाराला त्या पदावर काम करण्याची इच्छा आहे की नाही, याविषयी संबंधित उमेदवाराकडून खातरजमा करून घेईल.
(१९) लोकायुक्ताच्या सदस्य किंवा अध्यक्ष यांच्या निवृत्तीपूर्वी तीन महिने संबंधित पद सरकारकडून भरले जाईल. अचानक उद्भवलेल्या कारणांमुळे जर कोणतेही पद रिक्त झाले, तर ते पद रिक्त झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत भरले जाईल.
(२०) लोकायुक्ताच्या अधिकाऱ्यांची नेमणूक मंडळाकडून केली जाईल किंवा नियमानुसार अगर कायद्यानुसार तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या अगर कायमस्वरूपी अधिकारी मंडळाकडूनही ही नेमणूक केली जाईल.
(२१) संसद किंवा कोणत्याही राज्याच्या विधान मंडळात लोकायुक्ताचे अध्यक्ष किंवा सदस्य नोकरीस असणार नाहीत किंवा नफा मिळविणारे कोणतेही कार्यालयही सांभाळत नसतील. (अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून लोकायुक्ताचे कार्यालय वगळता) ते कोणताही उद्योग व्यवसाय करत नसतील किंवा कोणत्याही व्यवसायाची प्रॅक्टिस करत नसतील. साहजिकच, आपल्या पदाची सूत्रे हाती घेण्यापूर्वी अध्यक्ष किंवा सदस्य खालील गोष्टी करतील.
१) जर नफा मिळविणाऱ्या कोणत्याही कार्यालयाचा कार्यभार ते सांभाळत असतील, तर ते राजीनामा देतील.
२) जर ते कोणत्याही उद्योग व्यवसायात असतील, तर तेथील संबंध ते तोडून टाकतील. किंवा
३) ते कोणत्याही व्यवसायाची प्रॅक्टिस करत असतील, तर ती ते स्थगित करतील. किंवा
४) लोकायुक्तामधील त्यांच्या कामकाजात स्वारस्याचा संघर्ष निर्माण होऊ शकेल, अशा प्रकारची कोणत्याही कार्यक्रमाशी, कृतीशी अगर कामकाजाशी ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संबंधित असतील, तर आपले ते कार्यक्रम, कृती अगर कामकाज ते स्थगित करतील. तरीही जर त्यांच्या आधीच्या कृती, कार्यक्रम अगर कामकाजाचा लोकायुक्तामधील त्यांच्या कामकाजावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असेल, तर ती व्यक्ती लोकायुक्ताची अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून काम करू शकणार नाही.
(२२) लोकायुक्तातील पदाची सूत्रे घेतल्यापासून पाच वर्षे किंवा वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यंत संबंधित व्यक्ती संबंधित कामकाज करू शकेल. या दोन्हींपैकी जी गोष्ट आधी घडेल, त्यावेळी त्या व्यक्तीचा कार्यकाल संपुष्टात येईल.

पद सोडण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे घडेल.
अ) अध्यक्ष किंवा सदस्य राज्यपालांना उद्देशून लिहिलेले स्वहस्ताक्षरातील राजीनामापत्र सादर करेल.
ब) या कायद्यातील तरतुदींनुसार, अध्यक्ष किंवा सदस्य यांना त्यांच्या कामावरून दूरही करता येईल.
२३) अध्यक्षांना  उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांएवढे आणि सदस्यांना उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींएवढे वेतन दिले जाईल.
२४) अध्यक्ष किंवा सदस्य यांना दिले जाणारे भत्ते, निवृत्तिवेतन आणि अन्य सेवाशर्ती या सरकारने निश्चित केल्याप्रमाणे असतील. नेमणुकीनंतर अध्यक्ष किंवा सदस्य यांना गैरसोईचे ठरणारे बदल या संदर्भातील नियमांत केले जाणार नाहीत.
२५) केंद्र सरकार किंवा कोणतेही राज्य सरकार यांच्याकडच्या कोणत्याही पदावर किंवा सरकारकडून निधी दिल्या जाणाऱ्या कोणत्याही यंत्रणेतील पदावर, लोकायुक्ताचे अध्यक्ष किंवा सदस्य काम करू शकणार नाहीत. तसेच संसद किंवा कोणत्याही विधानमंडळाच्या अगर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीस उभेही राहू शकणार नाहीत.

(५) लोकायुक्त आपल्या सचिवाची निवड आणि नेमणूक करेल. या सचिवाला महाराष्ट्र सरकारच्या मुख्य सचिवाचा दर्जा असेल. लोकपालने संमत केलेल्या सर्व हुकूमांचा खरेपणा शाबीत करण्याचा अधिकार त्याला असेल.

---------------------------------------------------------

**प्रकरण ३**

**लोकायुक्त आणि त्याच्या अधिकाऱ्यांचे अधिकार आणि कार्ये**

**लोकायुक्ताची कार्ये**

**(६) लोकायुक्ताचे अधिकार आणि कार्ये खालीलप्रमाणे असतील.**

अ) भ्रष्टाचाराविरुद्धच्या कोणत्याही कायद्याखाली सुरू असलेल्या गुन्ह्यांच्या तपासावर देखरेख ठेवणे.
ब) अशा गुन्ह्यांच्या योग्य तपासासाठी तपास अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करणे.
क) सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध सुरू असलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाचा तपास पूर्ण झाल्यावर आणि संबंधित कर्मचाऱ्याची बाजू ऐकून घेतल्यानंतर त्याला काढून टाकणे, कामावरून दूर करणे किंवा पदावनती करणे यांपैकी शिक्षा देणे.
ड) या कायद्याखाली येणारी लोकांची गाऱ्हाणी कालबद्ध पद्धतीने निकाली काढली जातील, याकडे लक्ष देणे.
ई) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयासमोर खटला सुरू करणे.
फ) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या विशेष न्यायालयासमोर सुरू असलेल्या खटल्यांचे कामकाज योग्य पद्धतीने सुरू राहावे याकडे लक्ष पुरविणे.
ग) लोकायुक्ताचे कर्मचारी आणि अधिकारी यांच्या सेवाशर्ती, सेवेविषयीचे नियम आणि अटी, निवृत्तीवेतन आणि भत्ते यांविषयी कायद्यानुसार अटी आणि नियम तयार करणे.
ह) या कायद्याखाली प्रलंबित असलेल्या कोणत्याही खटल्याच्या संदर्भात लोकायुक्ताच्या खंडपीठाला पत्रे पाठविण्याचे अधिकार देणे.
इ) भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांच्या तक्रारींची नोंद घेणे.
ज) लोकायुक्ताच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध असलेल्या तक्रारीची नोंद घेणे.
ख) तपास अधिकारी, इतर अधिकारी आणि त्यांना कर्मचारी यांच्या नेमणुका करणे आणि तपासाच्या आधुनिक शास्त्रशुद्ध पद्धतींचे प्रशिक्षण देणे.
ल) न्याय अधिकारी, वकील आणि ज्येष्ठ  समुपदेशक यांच्या नेमणुका करणे.
म) योग्य तपासासाठी आवश्यक असलेली आधुनिक साधनसामग्री घेणे.
न) या कायद्यातील तरतुदींनुसार, भ्रष्ट मार्गांनी जमा केलेली संपत्ती आणि मालमत्ता यांवर टाच आणणे आणि काही प्रकरणांमध्ये ती जप्त करणे.
ओ) कोणत्याही भ्रष्ट मार्गाने मिळवलेला भाडेपरवाना, परवाना, परवानगी, कंत्राट किंवा करार रद्द करणे किंवा त्यात बदल करणे

याबाबतच्या शिफारशी करणे. भ्रष्टाचारात गुंतलेली एखादी फर्म, कंपनी, कंत्राटदार किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारस करणे. सार्वजनिक अधिकार यंत्रणा लोकायुक्तांच्या शिफारशींची अंमलबजावणी करेल किंवा करणार नाही. जर तिने अंमलबजावणी केली नाही, तर लोकायुक्त मुंबई उच्च न्यायालयात जाऊन संबंधित सार्वजनिक अधिकार यंत्रणेला उच्च न्यायालयाकडून योग्य मार्गदर्शक सूचना देऊ शकेल.
प) लोकायुक्तांच्या आज्ञांचे पालन करण्यात विलंब करणाऱ्यांवर या कायद्यातील तरतुदींनुसार कारवाई करणे.
क्यू) कोणत्याही स्त्रोताकडून कोणत्याही स्वरूपाच्या आलेल्या भ्रष्टाचारविषयक तक्रारीविषयी या कायद्याखाली तातडीने कृती सुरू करणे.
र) भ्रष्टाचाराची व्याप्ती कमी करण्यासाठी आणि भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्यांना बळी ठरवले जाऊ नये, यासाठी संबंधित सार्वजनिक अधिकार यंत्रणेशी सल्लामसलत करून त्यांना त्यांच्या कार्यपद्धतीत बदल घडविण्याच्या शिफारशी करणे.
यापैकी एखादी शिफारस स्वीकारणे अशक्य असेल तर त्याविषयीची तपशीलवार कारणे नमूद करून संबंधित यंत्रणा दोन महिन्यांच्या आत आपला अहवाल लोकायुक्तांकडे सादर करेल.
स) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांसाठी शिक्षेविषयीचे धोरण ठरवणे आणि वेळोवेळी त्यात सुधारणा करणे.
ट) या कायद्यात नमूद करण्यात आलेली कालमर्यादा कसोशीने पाळली जात असल्याबद्दल देखरेख करणे.
उ) यंत्रणांच्या सचोटीविषयी खातरजमा करून घेणे आणि आवश्यकतेनुसार संबंधितांना काढून टाकणे, कामावरून दूर करणे, पदावनती करणे यांसारख्या शिक्षा करणे.
ह) कोणत्याही सार्वजनिक यंत्रणेकडून लोकायुक्तांना हवी असलेली मदत मिळवणे.
व) भ्रष्टाचाराच्या कृती आणि पुरावे समोर आणणाऱ्या शासनातील आणि शासनबाह्य तक्रारदारांना प्रोत्साहन देण्यासाठी योग्य बक्षीस योजना तयार करणे.
या तक्रारींमुळे जेवढी रक्कम सापडली असेल किंवा जेवढ्या रकमेचे नुकसान टळले असेल, त्या रकमेच्या दहा टक्क्यांपेक्षा बक्षिसाची रक्कम अधिक असू नये.
क्ष) या कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली इतर कार्येही लोकायुक्त पार पाडतील.

**लोकायुक्ताच्या अधिकाऱ्यांचे अधिकार**

७ (१) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत प्रकरणांचा तपास करणाऱ्या लोकायुक्ताच्या अधिकाऱ्याला कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजरखाली तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला असलेले सर्व अधिकार असतील.
(२) लोकायुक्ताचा कोणताही सदस्य किंवा अधिकारी या कायद्याखाली आपले अधिकार वापरत असेल, तर त्याला कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजर, १९०८ अंतर्गत सुरू असलेल्या खटल्यांविषयी सिव्हिल कोर्टाला असलेले सर्व अधिकार प्राप्त होतील. याशिवाय त्याला खालील सर्व अधिकारही असतील.
अ) भारताच्या कुठल्याही भागातील कुठल्याही व्यक्तीला हजर होण्याचा आदेश काढणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे.
ब) कोणत्याही कागदपत्रांचा शोध घेणे आणि ती कागदपत्रे उपलब्ध करून देण्यास भाग पाडणे.
क) ॲफिडेव्हिट्सच्या साहाय्याने पुरावे मिळवणे.
ड) कोणत्याही कार्यालयाकडून किंवा न्यायालयाकडून सार्वजनिक नोंद किंवा त्यासंबंधीची प्रत मिळवणे.
ई) साक्षीदार किंवा इतर कागदपत्रांच्या तपासणीसाठी आयोग नेमणे.
फ) कायद्यात नमूद केलेल्या इतर कोणत्याही बाबींसाठी आयोग नेमणे.
३) लोकायुक्ताचे सर्व सदस्य आणि तपासणी अधिकाऱ्याच्या वरिष्ठ दर्जाचे लोकपालचे सर्व अधिकारी यांना तपासणी अधिकाऱ्याचे सर्व अधिकार असतील.
४) लोकायुक्ताच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशाची कोणत्याही लोकसेवकाने पायमल्ली केली, तर लोकायुक्ताचे खंडपीठ त्याला सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा एकत्रितपणे ठोठावू शकेल.
५) एखाद्या तक्रारीच्या तपासादरम्यान संबंधित शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी त्या पदावर असल्यामुळे तपासाच्या कामकाजावर विपरित परिणाम होण्याची शक्यता किंवा संबंधित अधिकारी त्या खटल्याशी संबंधित पुरावे किंवा कागदपत्रे नष्ट करण्याची किंवा त्यात फेरबदल करण्याची शक्यता असल्याचे किंवा तो साक्षीदारांवर दबाव टाकू शकेल किंवा भ्रष्टाचार तसाच सुरू ठेवेल, असे लोकायुक्तांना वाटले, तर ते त्या कर्मचाऱ्याची संबंधित पदावरून बदली करण्याचे किंवा त्याला निलंबित करण्याचे आदेश देऊ शकतील.
६) भ्रष्ट मार्गाने जमविली गेल्याचा आरोप असलेली मालमत्ता जर लोकसेवक लपवू पाहात असेल तर त्याला त्यापासून रोखण्यासाठी संबंधित अधिकारी यंत्रणेला तपासाच्या कोणत्याही टप्प्यावर या कायद्यांतर्गत लोकायुक्त अंतरिम आदेश काढू शकतो.
७) भ्रष्टाचारप्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत कोणत्याही गुन्ह्याचा तपास सुरू असताना याच गुन्ह्याचा तपास इतर कोणत्याही

कायद्याखाली करण्याचा अधिकारही लोकायुक्ताला असेल.
८) कोणत्याही प्रकरणाचा तपास सुरू असताना सार्वजनिक हिताच्या दृष्टिकोनातून भ्रष्टाचार रोखण्यासाठी कोणतीही प्रतिबंधात्मक कृती करण्याची गरज असल्याचे लोकायुक्तांना वाटले, तर संबंधित सार्वजनिक अधिकारी यंत्रणेला त्या कृतीची किंवा निर्णयाची अंमलबजावणी स्थगित ठेवण्याची शिफारस लोकायुक्त करू शकेल किंवा लोकायुक्ताने शिफारस केलेल्या कृतीची अगर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासही सांगू शकेल. ती सार्वजनिक अधिकारी यंत्रणा ही शिफारस मान्य तरी करेल किंवा शिफारस केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत ती नाकारेल. तिने ती नाकारलीच तर लोकायुक्त मुंबई उच्च न्यायालयाकडे संबंधित सार्वजनिक अधिकार यंत्रणेला योग्य आदेश देण्याची मागणी करू शकतो.

सर्च वॉरंट काढणे
(९) १. उपलब्ध माहितीच्या आधारे लोकायुक्त –
अ) १. या कायद्याखाली ज्या व्यक्तीवर समन्स बजावण्यात आले असेल किंवा जिला नोटीस पाठवण्यात आली असेल ती व्यक्ती तपासासाठी अगर चौकशीसाठी आवश्यक अगर उपयुक्त ठरणारी कागदपत्रे किंवा मालमत्ता किंवा तत्सम गोष्टी जमा करू शकणार नाही यावर विश्वास ठेवू शकेल.
अशा वेळी लोकायुक्त सर्च वॉरंटच्या साहाय्याने एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला संबंधित प्रकरणाच्या तपासासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या किंवा मालमत्तेच्या तपासाचे अधिकार देऊ शकेल. हा पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षकाहून कनिष्ठ पदावरील नसेल. त्याला अशी मालमत्ता किंवा कागदपत्रे ज्या जागेत ठेवली गेल्याचा संशय असेल त्या जागेत किंवा इमारतीत प्रवेश करणे आणि तपास करणे हे अधिकार सर्च वॉरंटद्वारे दिले जातील.
२. कोड ऑफ क्रिमिनल प्रोसीजर, १९७३ च्या तपासविषयक आणि जप्तिविषयक तरतुदी उपविभाग १ मधील प्रकरणांना लागू होतील.
३. उपविभाग १. अंतर्गत लागू केलेले कोणतेही सर्च वॉरंट हे कोड ऑफ क्रिमिनल प्रोसीजर, १९७३ च्या सेक्शन ८३ अंतर्गत न्यायालयाकडून लागू करण्यात येणारे सर्च वॉरंटच समजले जाईल.
--------------------------------------------

**प्रकरण ४.**

**लोकायुक्ताचे कामकाज**

१०. १) आपले, आपल्या अधिकाऱ्यांचे आणि विविध प्रकरणांसाठी नेमण्यात आलेल्या खंडपीठांचे कामकाज व्यवस्थितपणे पूर्ण व्हावे, यासाठी लोकायुक्त त्यावर नियंत्रण ठेवेल.
२) लोकायुक्ताची कोणतीही कृती किंवा कामकाज खालील बाबींमुळे रद्दबातल ठरवता येणार नाही.
अ) लोकायुक्तामधील एखादी जागा रिक्त असणे किंवा लोकायुक्ताच्या रचनेत एखादी त्रुटी अगर दोष असणे.
ब) लोकायुक्ताच्या एखाद्या कार्यरत सदस्याच्या नेमणुकीत त्रुटी किंवा दोष असणे.
क) संबंधित प्रकरणाला झळ न पोहचवू शकणारी लोकायुक्तामधील एखादी अनियमितता
३) नियम तयार करणे, कामकाजाचे अधिकार सुपूर्द करणे आणि कामे नेमून देणे यांविषयीचे सर्व धोरणात्मक निर्णय नियमांच्या अधीन राहून मंडळच घेईल.
४) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजरप्रमाणे कोणत्याही तक्रारकर्त्याची तक्रार प्राथमिक माहिती अहवालाच्या स्वरूपात नोंदवली जाईल. त्यासाठी कोणत्याही शुल्काची अगर ॲफिडेव्हिटची गरज असणार नाही. लोकायुक्ताच्या कोणत्याही कार्यालयात ही तक्रार दाखल करून घेतली जाईल. तक्रारीचे निमित्त किंवा तक्रारदाराचा हेतू याविषयी शंका घेऊन तक्रार नाकारता येणार नाही.
५) कोणत्याही तक्रारीचा तपास योग्य कारणे न नोंदवता संबंधित तपास अधिकाऱ्याला बंद करता येणार नाही.
६) लोकायुक्तासमोर आलेल्या कोणत्याही खटल्याची जाहीर सुनावणी केली जाईल. ज्या प्रकरणांच्या जाहीर सुनावणीमुळे सार्वजनिक हिताला बाधा पोहचण्याची शक्यता असेल तर ती याला अपवाद असतील. या प्रकरणांची सुनावणी 'इन कॅमेरा' होणार असेल, तर त्यासाठी त्यामागची कारणे नमूद करावी लागतील. जाहीर सुनावणी होणाऱ्या प्रकरणांच्या कामकाजाचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाईल. व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेल्या प्रतीचे शुल्क भरून कोणालाही ती प्रत विकत घेता येईल.
------------------------------------------------------------

**प्रकरण ५.**

**लोकायुक्तांची जबाबदारी.**

**लोकायुक्ताच्या अध्यक्षाला किंवा सदस्याला पदावरून दूर करणे.**

११. (१) लोकायुक्ताचा अध्यक्ष किंवा सदस्य यांना त्यांच्या पदावरून दूर करण्याचा अधिकार फक्त राज्यपालांनाच असेल. मुंबई उच्च न्यायालयाच्या शिफारशींनंतर राज्यपाल हा निर्णय घेतील. एखाद्या व्यक्तीने संबंधिताविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात तक्रार दाखल केली आणि तपासाअंती संबंधित व्यक्ती दोषी आढळली तर उच्च न्यायालय तशी शिफारस करेल. खालीलपैकी कोणत्याही कारणामुळे अध्यक्ष किंवा सदस्य यांना पदावरून दूर करण्याची शिफारस उच्च न्यायालय करू शकेल.

(२) अ) संबंधित व्यक्ती गैरवर्तणुकीबद्दल दोषी आढळल्यास.

ब) शारीरिक किंवा मानसिक दौर्बल्यामुळे कार्यभार सांभाळण्यास संबंधित व्यक्ती अपात्र असल्याचे आढळल्यास आणि

क) संबंधित व्यक्ती दिवाळखोर असल्याचा निकाल न्यायालयाने दिला असेल तर

ड) लोकायुक्ताच्या कार्यालयीन कामकाजाव्यतिरिक्त संबंधित व्यक्ती इतर कार्यालयात वेतन घेऊन काम करत असल्याचे आढळल्यास.

(२) यापैकी कोणत्याही कारणावरून उच्च न्यायालय संबंधित अध्यक्ष किंवा सदस्य यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची शिफारस करू शकेल.

(३) उच्च न्यायालयाने शिफारस केल्यावर राज्यपाल तातडीने संबंधित अध्यक्ष किंवा सदस्य यांना पदावरून दूर करतील.

(४) या सेक्शनखाली करण्यात आलेली तक्रार दाखल झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत उच्च न्यायालय निकाल देईल.

(५) ही तक्रार खोटी असल्याचे किंवा दुष्ट अगर अप्रामाणिक हेतूने केल्याचे आढळले, तर तक्रारदाराला दंड किंवा एक वर्षाचा तुरुंगवास किंवा दोन्ही शिक्षा उच्च न्यायालय ठोठावू शकेल.

**लोकायुक्ताच्या आदेशाविरुद्ध याचिका**

(१२) १) भारतीय राज्य घटनेच्या २२६ कलमाअंतर्गत लोकायुक्ताने किंवा लोकायुक्ताने नेमलेल्या खंडपीठाने किंवा लोकायुक्ताच्या कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयात दाद मागता येईल. सर्वसामान्यतः उच्च न्यायालय या आदेशाला स्थगिती देऊ शकणार नाही. पण त्यांनी स्थगिती दिलीच तर संबंधित निर्णयाला फक्त दोन महिन्यांचीच स्थगिती ते देऊ शकतील. दौन महिन्यांनंतर ही स्थगिती आपोआप रद्द होईल आणि पुन्हा या प्रकरणी स्थगिती देता येणार नाही.

**लोकायुक्ताची हिशेब तपासणी**

(१३) १) लोकायुक्ताची वार्षिक आर्थिक आणि कामकाजविषयक तपासणी कॅग करेल.

२) महाराष्ट्राची विधानसभा आणि विधान परिषद यांची योग्य संयुक्त समिती लोकायुक्ताच्या वार्षिक कामकाजाचे मूल्यमापन करेल. समितीने केलेल्या शिफारशी अमान्य असतील, तर लोकायुक्त तपशीलवार कारणे नमूद करून या संदर्भातील संकलित अहवाल राज्यपालांना सादर करेल. त्यानंतर राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर तो ठेवला जाईल.

**लोकायुक्तांचे अहवाल**

(१४) १) आपल्या कामकाजाचा एकत्रित वार्षिक अहवाल लोकायुक्ताचा अध्यक्ष विहित नमुन्यात राज्यपालांना सादर करेल.

२) हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्यपाल आपल्या टिप्पणीसह विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर त्याची प्रत ठेवतील.

३) आदल्या महिन्यात आलेल्या तक्रारींची यादी लोकायुक्त दर महिन्यात आपल्या वेबसाईटवर ठेवेल. त्यात निकाली काढण्यात आलेल्या प्रत्येक प्रकरणाची तपशीलवार माहिती, प्रत्येक तक्रारीची फलनिष्पत्ती आणि केली गेलेली कारवाई किंवा एखाद्या प्रकरणातील नियोजित कारवाई, प्रलंबित प्रकरणांची यादी, मंडळाच्या बैठकीतील नोंदी आणि कामकाज ही माहितीही वेबसाईटवर प्रकाशित केली जाईल.

--------------------------------

**प्रकरण ६.**

**लोकायुक्ताच्या अधिकाऱ्यांची जबाबदारी**

**स्वायत्त तक्रार अधिकारी मंडळ**

(१५) १) लोकायुक्ताचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी याच्याविरुद्धच्या तक्रारी नोदवून घेण्यासाठी एक किंवा त्याहून अधिक तक्रार अधिकारी यंत्रणांची उभारणी लोकायुक्त करेल.
२) या तक्रार अधिकारी यंत्रणेत पाच सदस्य असतील. त्यांची निवड या कायद्याच्या सेक्शन ४ अंतर्गत निवड समिती करेल. लोकायुक्तांच्या सदस्यांच्या निवड प्रक्रियेप्रमाणेच ही निवड प्रक्रियाही असेल.
३) या समितीच्या अध्यक्षाला कायद्याचे सर्वांगीण ज्ञान असेल. त्यात दोनहून अधिक निवृत्त सिव्हिल सर्व्हंट्सचा समावेश असणार नाही.
४) कोणत्याही अधिकारी अगर कर्मचाऱ्याविरुद्ध आलेल्या तक्रारीची चौकशी या तक्रार अधिकारी यंत्रणेसमोर जाहीरपणे केली जाईल. तक्रार दाखल झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण केली जाईल. संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जाईल. गैरवर्तन किंवा अप्रामाणिक तपास किंवा भ्रष्टाचार या संदर्भात जर तो अधिकारी किंवा कर्मचारी दोषी असल्याचे आढळले, तर ही यंत्रणा त्याला पदावरून काढून टाकणे, दूर करणे किंवा त्याची पदावनती करणे या संदर्भातील आदेश देऊ शकेल.
५) तक्रार अधिकार यंत्रणेच्या अंतिम निर्णयाविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम २२६ अंतर्गत उच्च न्यायालयात दाद मागता येईल.
६) काही प्रकरणांमध्ये लोकायुक्ताच्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला तक्रार अधिकारी यंत्रणा निलंबितही करू शकेल.
७) तक्रार अधिकारी यंत्रणेचा खर्च लोकायुक्ताला दिला जाईल.
८) या कायद्यातील तरतुदींनुसार, तक्रार अधिकारी यंत्रणा खंडपीठाच्या स्वरूपातही कामकाज करू शकेल.

**लोकायुक्तामधील पारदर्शकता**
(१६) लोकायुक्ताच्या कामकाजात संपूर्ण पारदर्शकता ठेवली जाईल. कोणतीही तक्रार अगर चौकशी यांच्याविषयीचा निकाल जाहीर करण्यात आल्यावर त्याविषयीच्या संपूर्ण नोंदी आणि तपशील लोकायुक्त जाहीरपणे वेबसाईटवर ठेवेल.
---------------------------------------------------

**प्रकरण ७.**

**उच्च पदस्थांविरुद्धच्या प्रकरणांचे तपास आणि खटले**

(१७) १) लोकायुक्तांच्या सात सदस्यीय खंडपीठाच्या परवानगीशिवाय खालीलपैकी कोणाही व्यक्तीविरुद्ध तपास किंवा खटला सुरू करता येणार नाही.
१. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील कोणताही सदस्य
२. उच्च न्यायालयाचा न्यायमूर्ती नसला, तरीही कोणताही न्यायाधीश
३. महाराष्ट्र विधानसभा आणि विधान परिषदेचा कोणीही सदस्य
---------------------------------

**प्रकरण ८.**

**नियम तयार करण्याचे लोकायुक्ताचे अधिकार**

(१८) १) या कायद्याच्या चौकटीत राहून कायद्यातील तरतुदींचे पालन करण्यासाठी आवश्यकतेनुसार लोकायुक्त नियम तयार करू शकेल. त्या संदर्भात तो नोटीस जाहीर करेल.
२) उपविभाग १) मधील अधिकाराविषयी कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह न बाळगता सर्वांसाठी असे नियम लागू होतील. तसेच हे नियम खालील बाबींसाठी लागू होतील.
अ) लोकायुक्तामध्ये कामाच्या सोईसाठी विविध विभाग तयार करणे. उदाहरणार्थ, चौकशी, खटले, तक्रारी किंवा गाऱ्हाणी वगैरे.
ब) विविध पातळ्यांवरील विविध अधिकाऱ्यांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सोपवणे. तसेच कोणत्याही तक्रारीच्या चौकशीसाठी पद्धती ठरवून देणे. या तक्रारींमध्ये लोकायुक्ताचे कर्मचारी आणि अधिकारी यांच्याविरुद्धच्या तक्रारींचाही समावेश असेल.
क) तपास आणि चौकशी पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करणे.
ड) लोकायुक्तांच्या खंडपीठांना काही विशिष्ट निर्णय घेण्यासाठी फक्त परिपत्रकाद्वारे सूचना देणे.
ई) लोकायुक्ताच्या प्रत्येक श्रेणीतील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी कामाच्या अटी तयार करणे.
३) महाराष्ट्र राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर लोकायुक्ताने तयार केलेले नियम ठेवण्यात येतील. दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यावर ते तातडीने राज्यभर लागू केले जातील.
-----------------------------------

**प्रकरण ९.**

**समस्या दूर करणे.**
(१९) १) या कायद्याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यात अडचण येत असेल, तर लोकायुक्ताने तशी शिफारस केल्यावर राज्य सरकार या कायद्यातील तरतुदींशी सुसंगत आदेश काढून ती अडचण दूर करेल. हा कायदा लागू होऊन दोन वर्षे उलटल्यावर मात्र अशा प्रकारे कोणताही आदेश काढला जाणार नाही.
२) या सेक्शनखाली काढलेला प्रत्येक आदेश राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवला जाईल.

**प्रकरण १०.**

**भ्रष्टाचाराचा तपास आणि न्यायालयीन कामकाज वेळेवर पूर्ण करणे.**

(२०) १) प्रत्येक तपास अधिकाऱ्याने त्याच्याकडे आलेल्या प्रकरणाचा तपास सहा महिन्यांच्या आत पूर्ण केला पाहिजे. आवश्यकतेनुसार, लोकायुक्ताच्या खंडपीठाकडून तो ही वेळ वाढवून घेऊ शकेल. मात्र कोणत्याही परिस्थितीत तपासाचा कालावधी १८ महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही.
२) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली दाखल झालेल्या प्रत्येक प्रकरणाचे न्यायालयीन कामकाज जास्तीत जास्त बारा महिन्यांत पूर्ण करण्यासाठी विशेष न्यायालये कसोशीने प्रयत्न करतील.
३) न्यायालयीन कामकाज जलद गतीने व्हावे, यासाठी दरवर्षी अशा प्रकरणांसाठी किती विशेष न्यायालयांची आवश्यकता आहे याचा आढावा लोकायुक्त घेईल. त्यानुसार तेवढ्या संख्येने विशेष न्यायालये तयार करण्याची शिफारस लोकायुक्त सरकारला करेल. लोकायुक्ताची ही शिफारस सरकारवर बंधनकारक असेल.
४) उच्च न्यायालयांचे न्यायमूर्ती संबंधित उच्च न्यायालयांमध्ये तेवढ्याच संख्येची खंडपीठे तयार करतील. या कायद्याखालील प्रकरणांची सुनावणी या खंडपीठांसमोर होईल. प्रत्येक प्रकरणाची सुनावणी शक्य तेवढ्या लवकर करून जास्तीत जास्त सहा महिन्यांत कामकाज पूर्ण व्हावे या उद्देशाने हे केले जाईल.
५) या कायद्याखालील प्रकरणांच्या सुनावणीसाठी तयार करण्यात आलेल्या विशेष न्यायालयांचे न्यायाधीश फक्त या कायद्यांतर्गत येणाऱ्या प्रकरणांचेच कामकाज करतील.
---------------------------------------

**प्रकरण ११.**

**तक्रारकर्ते किंवा आवाज उठविणारे**

(२१) १) सार्वजनिक अधिकार यंत्रणेत झालेल्या किंवा होत असलेल्या भ्रष्टाचाराची माहिती असलेल्या कोणत्याही सार्वजनिक अधिकाऱ्याला किंवा कोणत्याही व्यक्तीला भ्रष्टाचाराची माहिती गोपनीयरित्या लोकायुक्तांकडे पाठविण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. या माहितीच्या आधारे चौकशी करवून घेणे हे लोकायुक्तांचे कर्तव्य असेल. आवश्यकतेनुसार या माहितीच्या आधारे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली
तपासही केला जाईल.

२) तक्रारकर्त्यांना किंवा आवाज उठविणाऱ्यांना शारीरिक इजा किंवा प्रशासकीय छळ यांपासून संपूर्ण संरक्षण देणे हे लोकायुक्तांचे कर्तव्य असेल. तक्रारदाराची इच्छा असल्यास त्याची ओळख पूर्णपणे गुप्त ठेवली जाईल.

३) हा हेतू सफल होण्यासाठी संबंधित तक्रारदाराला संरक्षण देण्यासाठी सुरक्षा यंत्रणांना सूचना देणे किंवा तक्रारदारांचा प्रशासकीय छळ थांबविण्यासाठी अशाच प्रकारे अन्य एखाद्या अधिकार यंत्रणेला सूचना देणे हेही लोकपालाचे कर्तव्यच असेल.

४) या सेक्शनअंतर्गत येणाऱ्या प्रकरणांचा तपास तातडीने करून आदेश दिले जातील. तक्रार आल्यापासून एका महिन्याच्या आत तिचे निरसन केले जाईल. शारीरिक छळ प्रकरणी तातडीने कारवाई केली जाईल.

५) शारीरिक किंवा प्रशासकीय छळाचे बळी ठरलेल्या तक्रारकर्त्यांच्या तक्रारींचा तपास अत्यंत जलद गतीने करण्यात येईल. तक्रार आल्यापासून तीन महिन्यांत हा तपास पूर्ण केला जाईल.

**प्रकरण १२.**

**भ्रष्ट लोकसेवकांना शिक्षा आणि तुरुंगवास**

**शिक्षा**

(२२) १) कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध आलेल्या तक्रारीचा तपास पूर्ण झाल्यावर लोकायुक्त त्या कर्मचाऱ्याच्या विरुद्ध न्यायालयीन कामकाजाला सुरुवात करेल किंवा त्याला शिक्षा देण्यासाठीचे कामकाज सुरू करेल किंवा एकाच वेळी या दोन्ही गोष्टींना सुरुवात केली जाईल.

२) या सेक्शनचा हेतू पूर्ण होण्यासाठी, या कायद्यांतील नियम आणि अटी यांच्या अधीन राहून, निवृत्त न्यायाधीश किंवा निवृत्त सरकारी अगर नागरी कर्मचारी (सिव्हिल सर्व्हंट) किंवा तत्सम अन्य कोणाचीही न्याय अधिकारी म्हणून लोकायुक्त निवड करेल.

३) न्याय अधिकाऱ्यांचे खंडपीठ भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांची चौकशी करेल. त्या अधिकाऱ्याला त्याची बाजू मांडण्याची आणि कारणे देण्याची पूर्ण संधी दिली जाईल. चौकशी पूर्ण झाल्यावर निष्कर्ष काढून संबंधित कर्मचाऱ्याला शिक्षा द्यायची का आणि द्यायची असल्यास कोणती शिक्षा द्यावी याचा निर्णय खंडपीठ घेईल. लोकायुक्त कायद्यातील तरतुदींनुसार, या शिक्षेला लोकायुक्ताने नेमलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संमती दिल्यावरच ती अंमलात येईल.

४) अशा प्रकारे मान्य करण्यात आलेल्या शिफारशी स्वीकारणे नेमणूक करणाऱ्या अधिकारी यंत्रणेवर बंधनकारक असेल.

**तुरुंगवास**

(२३) १) भ्रष्टाचाराचे कोणतेही कृत्य सिद्ध झाल्यास गुन्ह्याच्या स्वरूपानुसार, किमान सहा महिने सश्रम कारावास ते कमाल जन्मठेपेपर्यंतची शिक्षा होऊ शकते.

२) संबंधित व्यक्ती जर उच्च पदावर कार्यरत असेल, तर ते लक्षात घेऊन विशेष न्यायालय त्याला अधिक कडक शिक्षा फर्मावेल.

३) या गुन्ह्याचा एखाद्या व्यवसायाला फायदा झाला असेल, तर या कायद्यांतर्गत आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत देणाऱ्या इतर शिक्षांखेरीज जनतेला झालेल्या तोट्याच्या पाचपट दंड संबंधित व्यवसायाकडून किंवा उद्योगाकडून वसूल केला जाईल. त्या व्यवसायाच्या मालकीच्या मालमत्तेतून हा दंड वसूल केला जाईल. तसेच त्या व्यवसायाच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या वैयक्तिक मालमत्तेतूनही तो वसून करून घेतला जाईल. हा दंड वसूल करण्यासाठी आरोपीची मालमत्ता पुरेशी ठरत नसेल, तर हा निर्णय घेतला जाईल.

४) जर एखादी कंपनी किंवा तिचा एखादा अधिकारी अगर संचालक यांना भ्रष्टाचारप्रतिबंधक कायद्याखाली दोषी ठरवण्यात आले, तर ती कंपनी आणि त्या कंपनीच्या कोणत्याही प्रमोटरने प्रमोट केलेल्या अन्य सर्व कंपन्यांचा काळ्या यादीत समावेश केला जाईल आणि भविष्यात त्यांना कोणतेही सरकारी काम किंवा कंत्राट दिले जाणार नाही.
५) एखाद्या लोकसेवकाला भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली दोषी ठरवले गेले, तर त्या लोकसेवकाला त्याच्या कार्यालयातून दूर केले जाईल.

(२४) या कायद्यांतर्गत कोणत्याही अधिकाऱ्यावर लोकायुक्ताने दंड आकारला तर तो दंड त्या अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल करून घेतला जाईल. या आदेशाचे पालन करणे हे त्या विबागाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे काम करणाऱ्या किंवा वेतनाचे वितरण करणाऱ्या अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल. या कर्तव्यात त्याने कसूर केली, तर तो दंड भरण्यास तो जबाबदार ठरेल.
----------------------

**प्रकरण १३ तक्रार निवारण यंत्रणा**

(२५) १) कायदा लागू झाल्यानंतर प्रत्येक सार्वजनिक अधिकारी यंत्रणा त्वरित एक विशिष्ट सनद तयार करेल. सनद तयार करण्याचा हा कालावधी एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

२) प्रत्येक नागरिकाच्या सनदेतून सार्वजनिक अधिकारी यंत्रणा नागरिकांविषयी असलेल्या त्यांच्या जबाबदाऱ्यांची यादी जाहीर करेल. या जबाबदाऱ्या ते कोणत्या विशिष्ट कालावधीत पूर्ण करणार आहेत तेही त्यात नमूद केले जाईल. सार्वजनिक अधिकारी यंत्रणेने जाहीर केलेल्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्यावर असेल, तेही त्यात स्पष्ट केलेले असेल.

३) जर एखाद्या सार्वजनिक अधिकारी यंत्रणेने वर्षभराच्या कालावधीत आपली नागरिकांची सनद तयार केली नाही, तर त्यांच्याशी सल्लामसलत करून लोकपाल स्वतः अशी सनद तयार करेल आणि तिच्यातील जबाबदाऱ्या पूर्ण करणे त्या यंत्रणेवर बंधनकारक असेल.
४) नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी करण्यासाठी उपलब्ध स्त्रोतांचा प्रत्येक सार्वजनिक अधिकारी यंत्रणा आढावा घेईल. त्यानंतर सरकारकडून त्यांना त्या स्त्रोतांचा पुरवठा केला जाईल.
५) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी यंत्रणा नागरिकांच्या सनदेचा भंग झाल्याच्या तक्रारी नोंदवून घेण्यासाठी त्या अधिकारी यंत्रणेचे कार्यालय असलेल्या प्रत्येक केंद्रात एका अधिकाऱ्याची नेमणूक करेल. त्याला सार्वजनिक तक्रार निवारण अधिकारी असे म्हटले जाईल.
६) सार्वजनिक तक्रार निवारण अधिकारी या पदावर सार्वजनिक अधिकार यंत्रणेच्या कार्यालयातील सर्वाधिक ज्येष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल.
७) तक्रार आल्यापासून तीस दिवसांच्या आत तिचे निराकरण करणे हे सार्वजनिक तक्रार निवारण अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.
८) जर तीस दिवसांच्या आत तक्रारीचे निवारण करण्यात सार्वजनिक तक्रार निवारण अधिकारी अपयशी ठरला, तर त्याविषयी लोकायुक्तांकडे तक्रार करता येईल.
९) सार्वजनिक तक्रार निवारण अधिकाऱ्याची बाजू ऐकून घेऊन विलंब झालेल्या प्रत्येक दिवसासाठी लोकायुक्त या अधिकाऱ्यावर ५०० रुपये दंडाची आकारणी करेल. मात्र एकूण दंडाची रक्कम ५० हजार रुपयांहून अधिक असणार नाही. ही रक्कम संबंधित अधिकाऱ्याच्या वेतनातून वसूल केली जाईल.
१०) याशिवाय काही प्रकरणांमध्ये तक्रार निवारण अधिकाऱ्यावर विभागांतर्गत शिक्षेची कारवाई करण्याची सूचनाही लोकायुक्त संबंधित अधिकाऱ्यांना देईल.
११) लोकायुक्ताने ठरवून दिलेल्या वेळेत तक्रारीचा निपटारा करण्याची सूचना योग्य सार्वजनिक अधिकारी यंत्रणेला लोकायुक्त देईल.
१२) प्रत्येक सार्वजनिक अधिकारी यंत्रणा त्यांनी तयार केलेल्या नागरिकांच्या सनदेचा वर्षातून किमान एकदा तरी आढावा घेईल आणि मूल्यमापन करून त्यात सुधारणा करेल. मूल्यमापनाची प्रक्रिया लोकायुक्ताच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत पार पडेल.
१३) लोकायुक्ताने दिलेल्या आदेशात नमूद करण्यात आलेले बदल नागरिकांच्या सनदेत अंतर्भूत करण्याची सूचना लोकायुक्त संबंधित सार्वजनिक अधिकारी यंत्रणेला देईल. संबंधित आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत संबंधित यंत्रणा ते बदल करेल. लोकायुक्ताच्या खंडपीठाच्या किमान तीन सदस्यांकडून या बदलाला मान्यता मिळाली पाहिजे.
१४) लोकायुक्ताचा किमान एक तरी अधिकारी प्रत्येक ब्लॉकमध्ये असला पाहिजे. तो त्या त्या भागातील तक्रारी स्वीकारेल. त्याला न्यायासन तक्रार अधिकारी (ॲपिलेट ग्रिव्हन्स ऑफिसर) म्हटले जाईल. ज्या ठिकाणी राज्य सरकारची कार्यालये मोठ्या प्रमाणात असतील, तिथे एकाहून अधिक वरिष्ठ न्यायासन तक्रार अधिकारी असतील.

१५) प्रत्येक न्यायासन अधिकाऱ्याचे दर सहा महिन्यांनी सामाजिक लेखा परीक्षण होईल. त्यावेळी तो लोकांना सामोरा जाईल. त्याच्या कामकाजाशी संबंधित माहिती आणि आकडेवारी तो लोकांसमोर सादर करेल. त्यांच्या चौकशांना उत्तरे देईल. तसेच लोकांच्या सूचनांचा विचार करून आपल्या कामकाजात तो त्यानुसार सुधारणा घडवून आणेल. या जनसुनावणीला लोकायुक्ताचा एखादा वरिष्ठ अधिकारी उपस्थित असेल.
१६) नागरिकांच्या तक्रारींचे निर्मूलन झाल्याशिवाय किंवा न्यायासन तक्रार अधिकाऱ्याने एखादे प्रकरण नाकारल्याशिवाय न्यायासन तक्रार अधिकारी कोणत्याही प्रकरणाचे कामकाज संपवणार नाही.

**प्रकरण १४**

**लोकायुक्ताचा अर्थसंकल्प**
(२६) १) लोकायुक्ताचा सर्व खर्च कन्सोलिडेटेड फंड ऑफ स्टेट ऑफ महाराष्ट्रकडून केला जाईल.
२) लोकायुक्ताच्या अर्थसंकल्पाला मंडळ अंतिम मान्यता देईल. महाराष्ट्र राज्य सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या ०.२५ टक्क्यांनी ते कमी असेल.
३) लोकायुक्ताला कोणत्याही प्रकारच्या खर्चासाठी कोणत्याही सरकारी एजन्सीकडून आर्थिक किंवा प्रशासकीय मान्यता घेण्याची आवश्यकता नाही.
-----------------------------------------------

**प्रकरण १५.**

**मालमत्तेवर टाच आणून आणि ती जप्त करणे. तसेच भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्याकडून नुकसानीची भरपाई करून घेणे**

(२७) १) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखाली एखादा लोकसेवक दोषी असल्याचे विशेष न्यायालयाला आढळल्यास त्या व्यक्तीची मालमत्ता आणि संपत्ती त्याने भ्रष्ट मार्गाने मिळविल्याचे न्यायालय मानेल.
२) ज्या मालमत्ता किंवा संपत्ती भ्रष्ट मार्गाने मिळविली गेल्याचे विशेष न्यायालयासमोर स्पष्ट होईल, त्या सर्व संपत्तीच्या आणि मालमत्तेच्या जप्तीचे आदेश विशेष न्यायालय संमत करेल.
३) संबंधित भ्रष्ट लोकसेवकाच्या या कृत्यामुळे इतर कोणत्याही व्यक्तीचे किंवा राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान झाले आहे का, याचा तपासही विशेष न्यायालय करेल. त्याच्या भ्रष्टाचारी कृत्यामुळे झालेल्या नुकसानीची संपूर्ण भरपाई देण्याचे आदेशही न्यायालय त्याला देईल. त्याच्या भ्रष्टाचारी कृत्यात सहभागी असलेल्या सर्वांवरच हा दंड आकारला जाईल आणि या रकमेची वसुली सर्वांकडून करून घेतली जाईल.
४) तपास अधिकाऱ्याला भ्रष्टाचाराची चौकशी करताना एखादी मालमत्ता किंवा संपत्ती भ्रष्ट मार्गाने जमवली गेल्याचे आढळले, तर तो त्या मालमत्तेवर किंवा संपत्तीवर टाच आणू शकेल. त्यामुळे तपास पूर्ण झाल्यावर ही मालमत्ता किंवा संपत्ती जप्त करणे सहजशक्य होईल. तसेच एखाद्या प्रकरणात आरोपीची त्या आरोपांमधून सुटका झाली, तर ही टाच आणलेली मालमत्ता किंवा संपत्ती त्याला परत केली जाईल.

-----------------------------------------------
**प्रकरण १६**

**लोकसेवकाची मालमत्ताविषयक निवेदनपत्रे**

( २८) १) हा कायदा लागू झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत आणि त्यानंतर दरवर्षी ३० जूनच्या आत प्रत्येक लोकसेवक आपल्या सार्वजनिक अधिकार यंत्रणेच्या प्रमुखाकडे किंवा या कायद्यातील नियमांत नमूद केलेल्या अधिकारी यंत्रणेकडे लोकायुक्ताने निश्चित केलेल्या ठराविक नमुन्यात आपली मालमत्ता, कर्जे आदींची माहिती भरून देईल. त्याच्या कुटुंबातील व्यक्तींच्या उत्पन्नांचे स्त्रोत, तसेच त्यांच्या मालमत्ता आणि कर्जे यांचे तपशीलही तो सादर करेल.
स्पष्टीकरण : या सेक्शनमध्ये नमूद करण्यात आलेले लोकसेवकाचे कुटुंबीय म्हणजे त्याचा जोडीदार, त्याची मुले, पालक आणि

त्याच्यावर अवलंबून असलेल्या अन्य व्यक्ती.
२) ही माहिती त्या वर्षीच्या ३१ ऑगस्टपूर्वी वेबसाईटवर टाकली जाईल याविषयी प्रत्येक सार्वजनिक अधिकारी यंत्रणेचा प्रमुख दक्षता घेईल.
३) एखाद्या लोकसेवकाने आपल्या मालमत्तेच्या माहितीत नमूद न केलेली मालमत्ता त्याच्याकडे असल्याचे आढळले, तर लोकायुक्त ती जप्त करेल.
४) मालमत्तेच्या माहितीत नमूद न केलेली अशी एखादी मालमत्ता लोकसेवकाच्या ताब्यात असल्याचे किंवा तो ती वापरत असल्याचे आढळले, तर त्याने ती त्याच्या मालकीची नसल्याचे सिद्ध करेपर्यंत ती त्याच्याच मालकीची असल्याचे गृहीत धरले जाईल.

**प्रकरण १७**

**इतर कायद्यांतील तरतुदी लागू करणे आणि त्यांच्यात बदल करणे**

(२९) १)भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील सेक्शन १९ (१) आणि १९ (२) तसेच क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन १९७ मधील तरतुदी लोकायुक्ताने किंवा लोकायुक्ताने अधिकार दिलेल्या त्याच्या एखाद्या अधिकाऱ्याने नियम तयार करून एकदा लागू केल्या तर लागू होतील.
२) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १०५ (क) ते १०५ (ल) तरतुदी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखालील गुन्ह्यांना लागू होतील.
३) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन ३८९ (३) च्या तरतुदी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखालील गुन्ह्यांना लागू होणार नाहीत.
४) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन ३७७ आणि ३७८ खाली याचिका दाखल करण्याचा हक्क लोकपाल बजावू शकेल.
५) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन ३७२ खाली तक्रारदारही याचिका दाखल करण्याचा हक्क बजावू शकेल.
(६) क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या सेक्शन ३९७ मध्ये कोणतीही तरतूद असली तरीही भ्रष्टाचारविरोधी कायद्याखालील गुन्ह्यासंदर्भात विशेष न्यायालयाचे कामकाज सुरू असेल, तर कोणतेही न्यायालय त्या गुन्ह्यासंदर्भातील कोणत्याही नोंदी मागवणार नाही.
तरीही जर न्यायालयाने त्या नोंदींची मागणी केलीच, तर महिन्याभरात त्या नोंदी परत कराव्या लागतील.
(७) भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याखालील कोणत्याही प्रकरणाचा तपास किंवा न्यायालयीन कामकाज सुरू करण्यासाठी कोणत्याही कायद्याखाली कोणतीही परवानगी घ्यावी लागत असेल, तर संबंधित प्रकरणी एकदा का लोकायुक्ताने तपासाची परवानगी दिली, की कोणत्याही स्वरूपाची अन्य परवानगी घेण्याची आवश्यकता उरणार नाही.
(८) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर, १९७३ मध्ये कोणत्याही तरतुदी असल्या तरीही दैनंदिन पातळीवरील न्यायालयीन कामकाज विशेष न्यायाधीश पाहू शकेल. तसेच कोणत्याही कारणासाठी तो हे कामकाज स्थगित ठेवणार नाही. तरीही त्याच्या मते, योग्य न्यायदानासाठी आवश्यक वाटल्यामुळे आणि इतर काही कारणांनी त्याला कामकाज स्थगित ठेवण्याची गरज भासलीच, तर तो त्यासाठीची लेखी कारणे नमूद करेल.
-----------------------------------------

**प्रकरण १८**

**संकीर्ण तरतुदी**

**चुकीच्या किंवा बनावट तक्रारींसाठी शिक्षा**

(३०) १) या कायद्यात कोणत्याही तरतुदी असल्या तरीही एखाद्याने या कायद्याखाली केलेली तक्रार निराधार आणि पुराव्याशिवाय केल्याचे आढळले आणि लोकायुक्ताला ती तक्रार फक्त एखाद्या अधिकाऱ्याचा किंवा अधिकार यंत्रणेचा छळ करण्यासाठी केल्याचे आढळले, तर लोकायुक्त त्याला योग्य वाटेल तेवढा दंड त्याला ठोठावू शकेल. पण कोणत्याही परिस्थितीत हा दंड एक लाखांपेक्षा अधिक असणार नाही.
तसेच तक्रारकर्त्याची बाजू ऐकून घेतल्याशिवाय शिक्षा दिली जाणार नाही.
तसेच एखाद्या प्रकरणात भ्रष्टाचाराचा आरोप सिद्ध झाला नसेल, तर फक्त म्हणून तक्रारकर्त्याला या तरतुदीखाली शिक्षा केली जाणार नाही.
लोकायुक्ताच्या एखाद्या अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध खोटी तक्रार केल्याचे आढळले, तर लोकायुक्त तक्रारकर्त्याला दंड

आणि तीन महिन्यांपर्यंत साध्या कैदेची शिक्षा देऊ शकेल.
२) लँड रेव्हेन्यू ॲक्टखालील थकबाकी म्हणून अशा दंडांची रक्कम वसूल करता येईल.
३) या कायद्याखाली एखादी तक्रार किंवा आरोप एकदा दाखल करण्यात आला, की कोणत्याही परिस्थितीत तो मागे घेता येणार नाही.

**भ्रष्टाचार रोखण्यासाठी तरतुदी**

(३१) १) आपल्या कार्यालयीन क्षमतेत जी कामे करणे शक्य आहे, अशा प्रकारची कोणत्याही व्यक्तीची, कंपनीची किंवा संघटनेची कामे, प्रकल्प किंवा सल्ले कोणताही सरकारी अधिकारी स्वतंत्र कामे म्हणून स्वीकारणार नाही.
२) सर्व कंत्राटे, सार्वजनिक-खाजगी भागीदारी, विक्री, भाडेपट्ट्याने देणे किंवा कोणत्याही प्रकारची देणगी अगर दान हे सारे व्यवहार सार्वजनिक अधिकारी किंवा सार्वजनिक अधिकार यंत्रणा पूर्ण पारदर्शकता ठेवून करेल. हे व्यवहार तातडीने करावयाचे नसतील, तर सार्वजनिक निविदा /लिलाव / बोली या मार्गानेच ते केले जातील. ज्यावेळी अशा प्रकारे हे व्यवहार करता येणे शक्य नसेल, त्यावेळी त्याची लेखी कारणे  नमूद केली पाहिजेत. यापैकी कोणत्याही गोष्टीचा भंग झाल्यास तो व्यवहार किंवा ते कंत्राट ग्राह्य धरले जाणार नाही. अशा सर्व देवघेवीच्या व्यवहारांचे तपशील सार्वजनिक अधिकार यंत्रणेने सार्वजनिक वेबसाईटवर ठेवले पाहिजेत.
३) नैसर्गिक स्त्रोतांचे स्थानांतरण समाविष्ट असलेली सर्व कंत्राटे, करार किंवा एमओयू किंवा अन्य कोणत्याही शीर्षकाखाली केले गेलेले असे कोणतेही व्यवहार पूर्ण झाल्याच्या सह्या झाल्या की त्यांची तपशीलवार माहिती एका आठवड्यात वेबसाईटवर ठेवली पाहिजे. जमिनींच्या किंवा खाणींच्या व्यवहारांसह इतर सर्व व्यवहारांना हा नियम लागू होईल. हे व्यवहार विक्री, भाडेपट्ट्याने देणे, करार करणे, सार्वजनिक - खाजगी भागीदारी किंवा अन्य कोणत्याही पद्धतीने झाले असले, तरीही त्यांचे तपशील व्यवहाराच्या कागदपत्रांवर सह्या झाल्यानंतर आठवडाभरात वेबसाईटवर टाकले गेलेच पाहिजेत.

**राज्य पोलीस दलाच्या भ्रष्टाचारविरोधी विभागाचे लोकायुक्तामध्ये विलिनीकरण**

(३२) १) राज्य पोलीस दलाचा भ्रष्टाचारविरोधी विभाग आणि राज्य दक्षता विभाग यांचे कर्मचारी, मालमत्ता आणि निष्ठा यांच्यासह लोकायुक्ताकडे हस्तांतरित केले जातील. हस्तांतरित केलेल्या या विभागांवर आणि त्यातील कर्मचाऱ्यांवर राज्य सरकारचे कोणतेही नियंत्रण उरणार नाही.
२) लोकायुक्ताकडे हस्तांतरित केलेला राज्य पोलीस दलाचा भ्रष्टाचारविरोधी विभाग हाच लोकायुक्ताचा तपास विभाग बनेल.
३) हस्तांतरित झालेल्या विभागांतील कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती आणि नियम हे  हा कायदा अंमलात येण्याआधी त्या कर्मचाऱ्यांचे जे वेतन, भत्ते, सेवाशर्ती आणि नियम असतील, त्याप्रमाणेच राहातील.
४) लोकायुक्ताकडे हस्तांतरित होण्यापूर्वी ज्या खटल्यांचे कामकाज या दोन्ही विभागांकडे असेल, तेच खटले आणि त्यांचे कामकाज त्यानंतरही त्यांच्याकडे तसेच सुरू राहील.

**काही प्रकरणांमध्ये लाच देणाऱ्याला माफी देणे**

(३३) एखाद्या प्रकरणात लाच देणाऱ्याने आपण लाच दिल्याचे सर्व पुराव्यांनिशी स्वेच्छेने आणि वेळेवर लोकायुक्ताला कळवले, तर विशेष न्यायालय त्याला न्यायालयीन कामकाजातून मुक्त करू शकते. त्याला माफी दिली जाते. लाच घेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याला / लोकसेवकाला पकडून देण्यासाठी त्याने ही कबुली दिलेली असावी. तसेच या प्रकरणी लाच दिल्यामुळे त्याला मिळालेले सर्व बेकायदेशीर लाभ त्याने सोडून दिले पाहिजेत. जर त्या लाच देणाऱ्याने दिलेली माहिती चुकीची असल्याचे आढळले, तर मात्र तातडीने त्याला दिलेली माफी मागे घेतली जाईल.